# प्रेस नोट

दिनांक ११/०५/२०२२

## खाजगी इसमास लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
| पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक | ठाणेनगर पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्रमांक ।। ३०७१/२००३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ चे कलम ७,८,१२,१३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **हिम्मतभाई उर्फ हेमराज हिरजी नंदा, वय ४४ वर्षे, खाजगी इसम** |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/— रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांचा थीनरने भरलेला मोटार टँकर पकडला असता तो सोडविण्याकरीता व अटक न करण्याकरीता वरील नमुद आरोपीस लोकसेवक यांचे सांगणेवरून तक्रारदार यांच्याकडुन ३,००,०००/— रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडुन, त्यांच्याविरूध्द ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०५/०९/२००३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, ७, ठाणे येथे नमुद आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी माननीय विशेष न्यायाधीश, श्री. आर.व्ही. ताम्हाणेकर साहेब, अतिरिक्त सत्र न्यायालय, ७, ठाणे येथे झाली असता, सुनावणीअंती नमुद आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी आरोप सिध्द झाल्याने दिनांक १०/०५/२०२२ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १२ प्रमाणे व सीआरपीसी कलम २७८(२) अन्वये ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/—रुपये(पाच हजार) दंड तसेच दंड न भरल्यास १५ दिवसाची साधी कारावासाची शिक्षा.**<br>सदर सापळा कारवाई श्री. विलास तुपे, सहायक पोलीस आयुक्त, लाप्रवि. मुंबई(सेवानिवृत्त) यांनी केली. तसेच गुन्हयाचा तपास श्री. एस.आर. गोसावी, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि, ठाणे यांनी केला असून, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्रीमती म्हात्रे मॅडम यांनी काम पाहीले.<br>तसेच पैरवी अधिकारी म्हणून श्रीमती अश्विनी पाटील, पो.उप अधीक्षक, लाप्रवि, ठाणे व पोहवा/एस आर शहा, पोना/पारधी लाप्रवि ठाणे यांनी काम पाहीले, |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री नं :— १०६४

दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटस ॲप क्र. :— ९९३०९९७७००


ASPatil

(अश्विनी पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.